# मुंबई विद्यापीठ

## परिपत्रक

क्र.मासंविक/आयसीडी/२०२१-२२/२०२७

विषय :- शासनमान्य पदांचे अनुकंपा विषयक धोरण विद्यापीठ फंडावरील कायम कर्मचा-यांना (वर्ग- "अ", "ब", "क" आणि "ड") अनुकंपा नियुक्ती अनुज्ञेय न करणेबाबत.

विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक, विभाग प्रमुख, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य, संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी, सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागाचे / कक्षाचे प्रमुख यांना याद्वारे कळविण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक:अकंपा-१२२१/प्र.क्र.११२/का-८, दिनांक २७ सप्टेंबर, २०२१ रोजीचे शासन निर्णयावर मा. व्यवस्थापन परिषदेच्या निर्णयानुसार मा. कुलगुरुंनी स्थापन केलेल्या समितीने विद्यापीठ फंडावरील अनुकंपा तत्वावरील नियुक्त्याबाबतचा अहवाल दि. १४ जुलै, २०२१ रोजी सादर केला. सदर अहवालावर मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २१ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या बैठकीत खालील ठराव पारित करण्यात आला.

> ***"अनुकंपा बाबतचे शासननिर्णय शासकीय कर्मचा-यांसाठीच लागू आहेत त्यामुळे ते विद्यापीठ फंडावरील पदास लागू करता येणार नाही. शासनाची ध्येय धोरणे वेळोवेळी बदलत आहेत त्यानुसार ऑटोनॉमस कॉलेज, क्लस्टर विद्यापीठ या वेगवेगळया संकल्पना प्रत्यक्षात अमलात येत आहेत व याचा प्रभाव विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांच्या संख्येवरही होत आहे त्यामुळे मुंबई विद्यापीठाशी संलग्नित मोठमोठ्या महाविद्यालयांना ऑटोनॉमस/क्लस्टर विद्यापीठ दर्जा प्राप्त झाल्याने या महाविद्यालयांकडून विद्यापीठास मिळणारे आर्थिक उत्पन्न कमी झालेले आहे. तसेच भविष्यातही यामुळे विद्यापीठाच्या आर्थिक बाबींवर मर्यादा येणार असल्याने सद्यस्थितीत विद्यापीठ फंडावरील अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या विद्यापीठ प्रशासनास न परवडणा-या असल्याने असे निर्णय (विद्यापीठ फंडावरील अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या) विचाराधीन घेता येणार नाहीत. "***

सदर बाब सर्व संबंधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिनस्त कर्मचारी/अधिकारी यांच्या निदर्शनास आणून द्यावे.

मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :- २९ डिसेंबर, २०२१

कुलसचिव

२/---

प्रति,
विद्यापीठातील सर्व विभागांचे संचालक / विभाग प्रमुख,
सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य,
मुंबई विद्यापीठ ग्रंथालयाचे ग्रंथपाल,
संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, वित्त व लेखा अधिकारी,
समन्वयक, रत्नागिरी उपकेंद्र, समन्वयक, ठाणे उपपरिसर,
समन्वयक, स्कुल ऑफ इंजिनिअरिंग अँड ॲप्लाईड सायन्सेस, कल्याण उपकेंद्र,
सर्व उपकुलसचिव, नियंत्रक, मुद्रण व लेखन सामुग्री,
विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव आणि
कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे / कक्षांचे प्रमुख

(अ) प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित :-

१. विद्यापीठातील सर्व उपकुलसचिव.
२. उपकुलसचिव/मुख्य लेखापाल (वित्त व लेखा विभाग).
३. स्थानापन्न नियंत्रक, मुद्रण व लेखन सामग्री, विद्यापीठ मुद्रणालय.
४. विद्यापीठ अभियंता, फोर्ट परिसर व विद्यानगरी परिसर
५. सर्व सहायक कुलसचिव,
६. सुरक्षा अधिकारी, तसेच सर्व सहायक सुरक्षा अधिकारी.
७. कुलसचिवांच्या कार्यालयातील सर्व विभागांचे /कक्षांचे प्रमुख.
८. उद्यान अधिक्षक/अधिक्षक (तांत्रिक), विधी विभाग.
९. स्वीय सहायक १) कुलगुरु, २) प्र-कुलगुरु, ३) कुलसचिव, ४) वित्त व लेखा अधिकारी,
५) संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ.

(ब) प्रत माहितीसाठी अग्रेषित् :-

१. अध्यक्ष, मुंबई युनिवर्सिटी ऑफिसर्स व वेल्फेअर असोसिएशन (मुनोवा).
२. सरचिटणीस, मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघ.
३. सरचिटणीस, शैक्षणिक कर्मचारी कल्याणकारी संघटना.